॥ विद्यामर्थं च साधयेत् ॥

PHALTAN EDUCATION SOCIETY'S

# COLLEGE OF ENGINEERING, PHALTAN

Ref. No. - 01/2025-26

Date-15/07/2025

## OFFICE ORDER

**Subject: Constitution of the Social Media Cell.**

**Reference:** All India Council for Technical Education (AICTE), New Delhi Approval Process Handbook **2024-25 to 2027**.

As per the guidelines provided by the AICTE, New Delhi, the **Social Media Cell** for Phaltan Education Society's College of Engineering is hereby constituted with effect from **January 1, 2024-25 to 2027**, until further orders. The primary vision of this cell is to enhance the digital presence of the institute and foster a meaningful connection with students, parents, alumni and the industry.

### Committee Members

| Sr. No | Name of Committee Member | Post |
|---|---|---|
| 1 | Dr. M. V. Dalvi | Chairman |
| 2 | Prof. S. V. Kalel | Member |
| 3 | Prof. A. T. Bhosale | Member |
| 4 | Prof. V. V. Gundage | Member |
| 5 | Prof. P. S. Sonone | Member |
| 6 | Prof. S.S. Pawar | Member |
| 7 | Ms. V. A. Borate Student Member | General Secretary |

### Key Responsibilities & Activities

1. To create and maintain a distinct brand identity for PES College of Engineering.
2. To highlight the academic and extracurricular achievements of students and faculty to the public.
3. To promote college events, seminars and workshops across various digital platforms throughout the year.
4. To improve reach and engagement with followers on official social media handles (Facebook, Instagram, LinkedIn, X).
5. Capturing high-quality photos and videos of college activities to build a digital archive.
6. Ensuring consistent branding and messaging across all departmental media coordinators.
7. Monthly meetings will be conducted to monitor social media analytics and plan future content strategies.

DALVI MANOJKUMAR VITHALRAO

Digitally signed by DALVI MANOJKUMAR VITHALRAO
Date: 2026.01.22 20:47:02 +05'30'

Principal
Phaltan Education Society's
College of Engineering, Phaltan

॥ विद्यामर्थं च साधयेत् ॥

PHALTAN EDUCATION SOCIETY'S

# COLLEGE OF ENGINEERING, PHALTAN

**Ref. No:** PES/COE/SMC/2025-26/01 **Date:** July 25, 2025

# MEETING NOTICE

All members of the **Social Media Cell** are hereby informed that a meeting is scheduled to discuss the digital strategy and content calendar for the upcoming month.

**Details of the Meeting:**

- **Date:** July 28, 2025 (Monday)
- **Time:** 03:30 PM
- **Venue:** Conference Hall / Principal's Office
- **Chairperson:** Dr. M. V. Dalvi (Chairman, SMC)

**Agenda of the Meeting:**

1. **Confirmation:** Review and confirm the minutes of the previous meeting.
2. **Performance Review:** Analysis of social media engagement (Facebook, Instagram, LinkedIn, X) for the month of July.
3. **Digital Archive:** Review of high-quality photo/video documentation of recent college events.
4. **Upcoming Events:** Planning the promotion strategy for next month's seminars and workshops.
5. **Branding Consistency:** Coordination with departmental media representatives to ensure uniform messaging.
6. **Any other point:** Discussion with the permission of the Chairperson.

All members are requested to attend the meeting punctually..

COLLEGE OF ENGINEERING (POLY.) PHALTAN

**Prof. S. V. Kalel**
Coordinator, Social Media Cell

**Copy to:**

1. Dr. M. V. Dalvi (Chairman)
2. All Committee Members (Prof. A. T. Bhosale, Prof. V. V. Gundage, Prof. P. S. Sonone, Prof. S.S. Pawar)
3. Office File

॥ विद्यामर्थं च साधयेत् ॥

PHALTAN EDUCATION SOCIETY'S

# COLLEGE OF ENGINEERING, PHALTAN

**Ref. No:** PES/COE/SMC/2025-26/02 **Date:** July 25, 2025

## MINUTES OF THE MEETING (MOM)

The monthly meeting of the **Social Media Cell** was held on July 28, 2025. The following members were present:

1. **Dr. M. V. Dalvi** – Chairman
2. **Prof. S. V. Kalel** – Member
3. **Prof. A. T. Bhosale** – Member
4. **Prof. V. V. Gundage** – Member
5. **Prof. P. S. Sonone** – Member
6. **Prof. S.S. Pawar** – Member

**Minutes of Discussion:**

**1. Review of Social Media Analytics:** Coordinator presented the engagement report for July. It was noted that Instagram reach increased by **15%**, but LinkedIn activity remains low.

- **Resolution:** Prof. S. V. Kalel to oversee the posting of technical achievements and faculty publications on LinkedIn to target the industry.

**2. Digital Archive & Event Documentation:** The committee reviewed the photo/video quality of the recent "Technical Workshop."

- **Resolution:** It was decided that Prof. S.S. Pawar will ensure a dedicated student photographer is assigned for every departmental event to maintain high-quality visual standards.

**3. Brand Identity & Uniformity:** Dr. M. V. Dalvi emphasized the need for a uniform "Template" for all event posters.

- **Resolution:** Prof. V. V. Gundage and Prof. A. T. Bhosale will design a standard template including the college logo and AICTE/PES branding for all departments to use.

**4. Upcoming Content Strategy (August 2025):** Planning was done for the upcoming Independence Day and Foundation Day celebrations.

- **Resolution:** A video series featuring "Alumni Success Stories" will be launched starting August 15th. Prof. P. S. Sonone will coordinate with the Alumni Cell for data.

**6. Any Other Points:** It was suggested that a "Student Media Team" (volunteers) be formed under the General Secretary to assist with daily stories and reels. The Chairman approved the proposal.

The meeting concluded with a vote of thanks to the Chair.

| | |
|---|---|
| **Prof. S. V. Kalel** | Dr. **M. V. Dalvi** |
| Coordinator | Chairman / Principal |

COLLEGE OF ENGINEERING (POLYTECHNIC) PHALTAN

॥ विद्यामर्थं च साधयेत् ॥

PHALTAN EDUCATION SOCIETY'S

# COLLEGE OF ENGINEERING, PHALTAN

**Ref. No:** PES/COE/SMC/2025-26/03

**Date:** July 25, 2025

## Action Taken Report (ATR)

| Sr. No | Agenda Item / Resolution | Action Taken | Responsibility | Status |
|---|---|---|---|---|
| 1 | **LinkedIn Engagement, Newspaper Publicity** | A schedule has been created to post at least two achievements or events on LinkedIn and News articles | Prof. S. V. Kalel | In Progress |
| 2 | **Digital Archive & Photography** | A list of 5 student volunteers with photography skills has been identified to cover all departmental events. | Prof. S.S. Pawar | Completed |
| 3 | **Brand Identity (Templates)** | Standardized templates for posters and social media stories (including PES/AICTE logos) have been drafted. | Prof. V. V. Gundage | Completed |
| 4 | **Alumni Success Stories** | Data for the first five successful alumni has been received from the Alumni Cell. Recording of video bytes is scheduled for the first week of August. | Prof. P. S. Sonone | In Progress |
| 5 | **Student Media Team, website, newsletter, magazine** | An official notice was circulated among students; 12 applications for the "Volunteer Media Team" were received and are being screened. | Prof. A. T. Bhosale | In Progress |

**Prof. S. V. Kalel**
Coordinator

COLLEGE OF ENGINEERING (POLYTECHNIC) PHALTAN

**Dr. M. V. Dalvi**
Chairman / Principal

पुण्य नगरी

# 'फलटण एज्युकेशन'च्या विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांत नोकऱ्या

**फलटण/प्रतिनिधी**

फलटण एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, फलटण येथे पदवी आणि पदविका उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी भव्य 'कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह'चे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून केवळ महाविद्यालयातीलच नव्हे, तर फलटण परिसरातील जास्तीत जास्त युवकांना देश-विदेशातील नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली जात आहे.

या मोहिमेची सुरुवात अत्यंत उत्साहात झाली असून, नुकतेच स्टोइक अँड सॅलामँडर,



फलटण : नोकरी मिळालेल्या विद्यार्थी व पालकांसमवेत श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, अरविंद निकम, डॉ. पार्शनाथ राजवैद्य, प्राचार्य मनोजकुमार दळवी व अन्य

जेबिल सर्किट इंडिया लिमिटेड आणि हारनेक्स सिस्टिम्स या कंपन्यांचे ड्राईव्ह यशस्वीरित्या संपन्न झाले.

या निवड प्रक्रियेतः जेबिल सर्किटः डिग्री १५ विद्यार्थी, डिप्लोमा १० विद्यार्थी, स्टोइक अँड सॅलामँडरः ०५ विद्यार्थी हारनेक्स सिस्टिम्सः ०१ विद्यार्थी. व्हर्च्युसा : ०१ विद्यार्थी (आयटी क्षेत्र) अशा प्रकारे अनेक विद्यार्थ्यांनी आपली निवड निश्चित करत यशाची मोहोर उमटवली आहे.

या प्लेसमेंट मोहिमेमध्ये आयटी आणि कोअर इंजिनिअरिंग क्षेत्रातील प्रतिष्ठित कंपन्या सहभागी होत आहेत. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस , इन्फोसिस, कॉग्निझंट, कमिन्स इंडिया, बजाज, अ‍ॅक्मे इन्फोव्हिजन, एक्सटेन्सिबल सॉफ्टवेअर सोल्युशन्स अशा कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. महाविद्यालयातील तसेच फलटण परिसरातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबत आमचे प्रशासन कटिबद्ध आहे. ग्रामीण भागातील बुद्धिमत्तेला जागतिक व्यासपीठ मिळावे हाच आमचा मानस आहे,असे संस्थेचे अध्यक्ष श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी सांगितले.

उपक्रमाचे आयोजन फलटण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर, चेअरमन श्रीमंत रघुनाथराजे नाईक निंबाळकर, सेक्रेटरी संजीवराजे नाईक निंबाळकर, आणि महाविद्यालय समितीचे चेअरमन अनिकेतराजे नाईक निंबाळकर यांच्या खंबीर नेतृत्वाखाली करण्यात येत आहे.

Satara Edition
Dec 24, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

सकाळ

# फलटण अभियांत्रिकीत दर्जेदार शिक्षणाची संधी

## संजीवराजे नाईक- निंबाळकर; विद्यार्थ्यांसाठीच्या नोट्स क्यूआर कोडचे उद्घाटन

**आसू/जाधववाडी, ता. १ :** डिजिटल युगात शिक्षण पद्धतीत नावीन्यपूर्ण बदल करणे ही काळाची गरज आहे. त्यादृष्टीने कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगने महाविद्यालयाच्या अधिकृत युट्यूब चॅनेल आणि क्यूआर कोड्सची निर्मिती करून एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. याद्वारे विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी प्राप्त होईल, असे मत संस्थेचे सचिव संजीवराजे नाईक- निंबाळकर यांनी व्यक्त केले.

फलटण येथील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग महाविद्यालयाच्या अधिकृत युट्यूब चॅनेल आणि नोट्स क्यूआर कोड उपक्रमाचे उद्घाटन संजीवराजे नाईक- निंबाळकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी संस्थेचे सदस्य भोजराज नाईक- निंबाळकर, हेमंत रानडे, पार्श्वनाथ राजवैद्य, शिरीष दोशी, शिरीष भोसले, प्रशासन अधिकारी प्राचार्य अरविंद निकम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोजकुमार दळवी आदी मान्यवर उपस्थित होते.



**फलटण :** युट्यूब चॅनेल व क्यूआर कोडचे उद्घाटनप्रसंगी संजीवराजे नाईक- निंबाळकर, अरविंद निकम, मनोजकुमार दळवी, हेमंत रानडे व इतर.

अरविंद निकम म्हणाले, "विद्यार्थ्यांच्या सुलभ अध्ययनासाठी डिजिटल शिक्षणाच्या दिशेने भक्कम पावले टाकत आहोत. आयसीटी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून बनवलेला युट्यूब चॅनेल आणि क्यूआर कोड नोट्सचा समन्वय हा आमच्या महाविद्यालयाच्या शैक्षणिक नवोन्मेषतेचे प्रतीक आहे.''

प्राध्यापकांनी स्वतः तयार केलेले विषयानुरूप व्याख्यानांचे आणि प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिकांचे व्हिडिओ अपलोड केले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना व्हिडिओ लेक्चर्स आणि हस्तलिखित नोट्स या दोन्ही महत्त्वाच्या साधनांचा एकाच ठिकाणी लाभ घेता येणार आहे. शिक्षण अधिक प्रभावी आणि आत्मनिर्भर बनेल, असेही श्री. निकम यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. मनोजकुमार दळवी यांनी स्वागत केले. प्रा. रूजल दोशी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. धनश्री बनकर यांनी नियोजन केले. प्रा. अभिजित हिप्परकर यांनी आभार मानले.

सकाळ

# कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला नॅकचे 'ए' मानांकन

## फलटण एज्युकेशन सोसायटीच्या कामगिरीत मानाचा तुरा; रामराजेंकडून अभिनंदन



**दुधेबावी, ता. ५ :** जिल्ह्यातील अभियांत्रिकी शिक्षणात प्रतिष्ठेचे स्थान लाभलेल्या फलटण एज्युकेशन सोसायटी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग या महाविद्यालयाने राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद (नॅक) कडून 'ए' ग्रेड प्राप्त करून जिल्ह्यात अभियांत्रिकी क्षेत्रात मानाची कामगिरी केली आहे.

'नॅक'च्या पिअर समितीने ऑक्टोबर महिन्यात महाविद्यालयास भेट देऊन सखोल पाहणी केली आणि महाविद्यालयाच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेऊन ता. एक नोव्हेंबरला 'ए' ग्रेड मानांकन सन्मानपूर्वक प्रदान केले आहे.

या मानांकनामुळे महाविद्यालयाच्या शिक्षण आणि संशोधन क्षेत्रातील गुणवत्तेला राष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त झाली आहे. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या उद्दिष्टाने विविध क्षेत्रांमध्ये केलेली प्रगती, संशोधन आणि विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकासासाठी चालविलेल्या उपक्रमांना नॅकतर्फे गौरविण्यात आले आहे. जिल्ह्यातील उच्च गुणवत्तेच्या अभियांत्रिकी शिक्षणासाठी हे यश प्रेरणादायी ठरले असून, फलटण एज्युकेशन सोसायटीच्या उत्कृष्ट व दर्जेदार शिक्षण देण्याच्या परंपरेचा ठसा या मानांकनातून अधोरेखित झाला आहे.

या यशामध्ये फलटण एज्युकेशन सोसायटीचे सचिव संजीवराजे नाईक-निंबाळकर, व्यवस्थापन समितीचे सदस्य, प्रशासन अधिकारी अरविंद निकम, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. नरेंद्र नार्वे यांचे मार्गदर्शन विशेषत्वाने उल्लेखनीय ठरले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली आयक्यूएसी समन्वयक प्रा. शांताराम काळेल तसेच सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अविरत मेहनत घेऊन नॅक समितीच्या सर्व निकषांची तयारी केली.

फलटण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आमदार रामराजे नाईक निंबाळकर, आमदार दीपक चव्हाण, नियामक मंडळाचे अध्यक्ष रघुनाथराजे नाईक निंबाळकर, सचिव संजीवराजे नाईक निंबाळकर, महाविद्यालय विकास समिती सदस्य भोजराज नाईक निंबाळकर, हेमंत रानडे, डॉ. पार्श्वनाथ राजवैद्य, शिरीष दोशी, शिरीष भोसले, प्रशासन अधिकारी प्राचार्य अरविंद निकम यांनी या यशाबद्दल महाविद्यालय संपूर्ण टीमचे अभिनंदन केले.

Satara, Satara-Today
06/11/2024 Page No. 4

ऐक्य




बोलताना भोजराज नाईक निंबाळकर, व्यासपीठावर मान्यवर.

# फलटणमध्ये परदेशी शिक्षणाची कवाडे खुली

## अभियांत्रिकी महाविद्यालय, फलटण येथे आयोजित 'स्टडी अॅब्रॉड एक्स्पो'ला विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद

**फलटण**, दि. २७ : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण येथेच घेता यावे, यासाठी फलटण एज्युकेशन सोसायटी संचलित अभियांत्रिकी महाविद्यालय, फलटण आयोजित 'स्टडी अॅब्रॉड अँड करिअर अॅपॉर्च्युनिटीज एक्स्पो २०२५' ला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या एक्स्पोच्या माध्यमातून फलटणमधील विद्यार्थ्यांसाठी परदेशातील उच्च शिक्षणाची दारे खुली झाली असून याचा लाभ घेण्याचे आवाहन फलटण एज्युकेशन सोसायटी नियामक मंडळ सदस्य भोजराज नाईक निंबाळकर यांनी केले. मंगळवारी अभियांत्रिकी महाविद्यालय येथे आयोजित स्टडी अॅब्रॉड अँड करिअर अॅपॉर्च्युनिटीज एक्स्पो २०२५ च्या अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना भोजराज नाईक निंबाळकर बोलत होते. यावेळी सोसायटीचे प्रशासन अधिकारी प्राचार्य अरविंद निकम, मुधोजी हायस्कूलचे प्राचार्य वसंत शेंडगे, गुरुद्रोणा अॅकॅडमीचे संचालक अविनाश नरुटे, आर्या अकॅडमी, लोणंदचे संचालक महाजन विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. या एक्स्पोमध्ये नायगारा कॉलेज (कॅनडा), एस्टोन विद्यापीठ (युके), लीड्स बकेट विद्यापीठ (युके) आणि ॲलीनॉईज इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (यूएसए) यांसारख्या प्रतिष्ठित जागतिक संस्थांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तसेच अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, जर्मनी, सिंगापूर, दुबई, न्यूझीलंड आणि दक्षिण कोरिया या देशांतील शिक्षण पद्धती, प्रवेश प्रक्रिया आणि संधींविषयी तज्ज्ञांनी सविस्तर माहिती देवून मार्गदर्शन केले. केवळ प्रवेशच नव्हे, तर परदेशातील शिष्यवृत्ती, इंटर्नशिप्स आणि वर्क-अॅपॉर्च्युनिटीज यावरही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. क्रेडिला (Credila) व इतर बँकांच्या प्रतिनिधींनी शैक्षणिक कर्जाच्या सुलभ पर्यायांची माहिती दिली, तसेच जीआरई (GRE) आणि जी मॅट (GMAT) या स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी तज्ज्ञ समुपदेशकांनी विद्यार्थ्यांना मोलाचा सल्ला दिला. नॅक (NAAC) 'A' ग्रेड आणि NBA मानांकन प्राप्त असलेल्या या अभियांत्रिकी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी 'अॅडव्हाइस इंटरनॅशनल' या संस्थेसोबत सामंजस्य करार (MOU) केला आहे. या करारांतर्गतच या एक्स्पोचे आयोजन करण्यात आले होते. अभियांत्रिकी, फार्मसी, नर्सिंग, कृषी, पॉलिटेक्निक महाविद्यालयातील तसेच इयत्ता ११ वी - १२ वी च्या शेकडो विद्यार्थ्यांनी या सुवर्ण संधीचा लाभ घेतला. फलटण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर, नियामक मंडळ चेअरमन श्रीमंत रघुनाथराजे नाईक निंबाळकर, सेक्रेटरी श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज कुमार दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रेरणेतून हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला.

शनाचा निर्धार



Main Edition
Nov 28, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com

सकाळ

# फलटणला कुरुक्षेत्र २०२५ तांत्रिक स्पर्धेस प्रतिसाद

## राज्यभरातून हजारहून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग; मान्यवरांची उपस्थिती

**आसू/जाधववाडी, ता. ३** : 'कुरुक्षेत्र २०२५' या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्यांचा विकास करण्याची संधी मिळते आणि विज्ञान-तंत्रज्ञानाच्या विविध संकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यास मदत होते, या उपक्रमामुळे अभियांत्रिकी विद्यार्थ्यांमध्ये नावीन्यपूर्ण तांत्रिक विचारांची पेरणी करून त्यांच्यामध्ये व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्याचा स्तुत्य प्रयत्न आहे, असा प्रतिपादन फलटण एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संजीवराजे नाईक-निंबाळकर यांनी केले.

फलटण एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वतीने कुरुक्षेत्र २०२५ या राज्यस्तरीय तांत्रिक स्पर्धेचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.



**फलटण** : मार्गदर्शन करताना संजीवराजे नाईक-निंबाळकर, व्यासपीठावर भोजराज नाईक-निंबाळकर, प्राचार्य डॉ. एन. जी. नार्वे.

यावेळी फलटण एज्युकेशन सोसायटीच्या गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य भोजराज नाईक-निंबाळकर, पराग दोशी, प्राचार्य डॉ. एन. जी. नार्वे यांची प्रमुख उपस्थिती होती. या महोत्सवांतर्गत विजेते, उपविजेते तसेच वैयक्तिक आणि सांघिक खेळांमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. राज्यभरातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा स्पर्धेस उदंड प्रतिसाद मिळाला. एक हजारहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयाच्या पदवी विभागाने नॅक 'अ' मानांकन प्राप्त केले असून, डिप्लोमा विभागाला एनबीए मानांकन मिळाले आहे. या मानांकनांमुळे संस्थेच्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तब झाले असून, विद्यार्थ्यांच्या शिक्षणास चालना मिळणार आहे, असे प्राचार्य डॉ. एन. जी. नार्वे यांनी सांगितले.

Satara, Satara-Today

सकाळ

# फलटणच्या इंजिनिअरिंग कॉलेजला एनबीए मानांकन

आसू/ जाधववाडी, ता. ७ : फलटण एज्युकेशन सोसायटी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला डिप्लोमा कोर्सेससाठी तीन वर्षांचे एनबीए मानांकन प्राप्त झाले आहे. यामध्ये कॉलेजने प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय मानांकन मिळवून महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन विभागांना तीन वर्षांचे एनबीए मानांकन प्राप्त झाले आहे. या मानांकनामुळे विद्यालयाची राष्ट्रीयस्तरावर एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रात उत्तम संधी उपलब्ध होतील आणि महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उंचावेल, असा विश्वास प्राचार्य नरेंद्र नार्वे यांनी व्यक्त केला आहे, तसेच एनबीए मानांकनाने फलटण एज्युकेशन सोसायटीच्या नावाला राष्ट्रीय स्तरावर एक वेगळी ओळख मिळाली असून, भविष्यातही अशीच यशस्वी वाटचाल करण्यासाठी सर्वांचे प्रयत्न सुरू राहतील, असेही प्राचार्य नार्वे यांनी सांगितले.

गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि संशोधनाच्या दृष्टिकोनातून महाविद्यालय प्रगतीचा आलेख उंचावत राहील, अशी ग्वाही सेक्रेटरी संजीवराजे नाईक-निंबाळकर यांनी दिली आहे.

या यशाबद्दल रामराजे नाईक-निंबाळकर, रघुनाथराजे नाईक-निंबाळकर, संजीवराजे नाईक- निंबाळकर, अरविंद निकम यांनी प्राचार्य तसेच सर्व प्राध्यापक यांचे अभिनंदन केले.

# Institutes Social Media Handles

YouTube

**Link :**
**https://youtube.com/@pescollegeofengineeringphaltan?si=HAbIBWe4GJmdGgBV**



**Link :** https://www.facebook.com/share/183FH6WnnY/



**Link:**https://www.instagram.com/coe.phaltan_official?igsh=dWw1M29uNHptaXBn

